शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे - अजित पवार



e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 28/01/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 33 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# आता संघटनात्मक बांधणीकडे लक्ष देण्याची गरज

## संजय राऊत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : "लोकसभा, विधानसभा निवडणुकीनंतर आता संघटनात्मक बांधणीकडे लक्ष देण्याची गरज आहे. आगामी कालावधीमध्ये होणाऱ्या महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज बैठक घेतली आहे. या बैठकी दरम्यान पदाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहे. पण यावेळी कोणी म्हणत होतं, आपण स्वबळावर लढलं पाहिजे, तर कोणी म्हणतं महाविकास आघाडीसोबत राहिलं पाहिजे, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी मांडली" असल्याचे खासदार संजय राऊत यांनी पुण्यात म्हंटले आहे. संजय राऊत हे आज पुणे दौऱ्यावर होते.



त्यावेळी पुणे आणि बारामती या दोन्ही विभागाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संजय राऊत यांनी घेतली. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे, आमदार सचिन अहिर ,माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, पुणे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, वसंत मोरे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.तसेच ते पुढे म्हणाले की, मात्र आम्ही आगामी होणाऱ्या निवडणुका पूर्णपणे ताकदीने लढणार असल्याचा निर्धार यावेळी केला असून आगामी निवडणुकांबाबत महाविकास आघाडीतील प्रमुख नेतेमंडळी एकत्रित बैठक घेऊन कशा प्रकारे निवडणुक लढवली पाहिजे, याबाबत निर्णय घेतील असे त्यांनी यावेळी सांगितले.

# संजय गुप्तांचा पक्षाशी काही संबंध नाही

## आदित्य ठाकरेंनी केला संताप व्यक्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी संजय गुप्ता हे पक्षाशी काही संबंध नसताना टीव्ही चॅनल्सवर जाऊन पक्षाची बाजू मांडल्याचा आरोप केला आहे. आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याबद्दल संताप व्यक्त केला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर आदित्य ठाकरे यांनी पोस्ट करत आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत.



दरम्यान, संजय गुप्ता यांचा पक्षाशी काही संबंध नसताना ते काही टीव्ही चॅनलवर पक्षाची बाजू मांडत असल्याचे आदित्य ठाकरे यांचे म्हणणे आहे. दरम्यान आता शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. यावेळी त्यांनी आपण या प्रकरणी कायदेशीर कारवाई करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

आदित्य ठाकरे त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले की, "संजय गुप्ता नावाचा तोतया हा रोगट आणि घाणेरड्या मानसिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या काही न्यूज चॅनेलच्या शोमध्ये जातो. हा लबाड माणूस पक्षाचा प्रवक्ता नाही आणि त्याचा पक्षाशी काहीही संबंध नाही हे पक्षाने अनेक वेळा स्पष्ट करूनही, हे निवडक चॅनेल्स त्याला त्यांच्या शोमध्ये आमचा 'प्रवक्ता' किंवा 'समर्थक' म्हणून बोलावतात. याविरोधात आम्ही कायदेशीर कारवाई करणार आहोत. काही युट्युब चॅनल आणि चॅनेल्सना स्वत:च्या टीआरपीसाठी अशा लबाड लोकांची गरज भासते हे लज्जास्पद आहे", असे आदित्य ठाकरे त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.

# शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शेतीत प्रगती साधण्याच्यादृष्टीने शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे; शेतकरी संशोधक असला पाहिजे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.




कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने आयोजित 'इंदापूर कृषी महोत्सव २०२५' च्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार बाबासाहेब देशमुख, उप विभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके, आजी, माजी संचालक मंडळ आदी उपस्थित होते.

यावेळी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने अतिशय नेत्रदीपक कृषी प्रदर्शन, जनावरे, घोडेबाजार व डॉग शो आयोजित केला. यामुळे शेतकऱ्यांना नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होते. त्यादृष्टीने नवीन माहिती, तंत्रज्ञान यासोबतच जातिवंत जनावरांची ओळख इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती करत आहे ही समाधानाची बाब आहे. या बाजार समितीला शेतकरी निवास उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

पवार पुढे म्हणाले, या ठिकाणी अनेक वेगवेगळ्या प्रकारची उत्पादने, आधुनिक शेतीची साधने, महिला बचत गटांची उत्पादने, गृहोपयोगी वस्तू पाहायला मिळाल्या. पुणे जिल्ह्यातील एकमेव घोडेबाजार या ठिकाणी पाहायला मिळाला. महाराष्ट्रातील देशातील दोनशे प्रकारची जातीवंत घोडे वैशिष्ट्यपूर्ण डॉग शो, खिलार जनावरे, बैल, गाई या ठिकाणी पाहायला मिळाले.

इंदापूर तालुक्यातील शेतकरी डाळिंब, केळी, पेरू, द्राक्षे, ड्रॅगन फ्रुट आदी फळबागांत अग्रेसर आहे. येथील शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे द्राक्षाचे वाण तयार केले आहेत. हे पाहता शेतकऱ्याने शास्त्रज्ञासारखा विचार केला पाहिजे. शेतीत आधुनिक तंत्रज्ञान वापरले पाहिजे. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, पिकाला माफक पाणी देण्याची पद्धत, ऊसाचे उत्पादन वाढविणे, चांगल्या प्रकारची फुले, फळे कशी पिकवावीत याबाबतचे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजे. आपल्याकडे शेतीत आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, इतर राज्यातील, देशातील तंत्रज्ञान आणावे लागेल, अशी सूचनाही त्यांनी केली.

पवार पुढे म्हणाले, आपल्या कृषी प्रधान देशात कृषी विकासाला प्रचंड क्षमता आहे. कृषी क्षेत्रात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला वाव देऊन अनेक संधीचा लाभ देता येऊ शकतो. शेतीतून मिळणारे उत्पादन खाद्यासोबतच देशाच्या उद्योग व्यवसाय प्रक्रियेत वापरले जाते. आता जगामध्ये जागतिक हवामान बदलासह शेतीसमोर अनेक आव्हाने असून त्यामुळे कृषी मालाचा पुरवठा कमी होऊ शकतो. निविष्ठा खर्चामुळे शेतकऱ्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही. लांब आणि खंडित जमीन असल्यामुळे उत्पादकता कमी होते. यावर मात करून शेतकऱ्यांना पुढे जाणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकरिता आगामी अर्थसंकल्पात शक्य तितकी मदत करण्यात येईल. सरकार जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न करत असताना गैरफायदाही घेण्याचा प्रकार होऊ नये, असेही पवार म्हणाले.

# 'डोणे प्रीमियर लीग २०२५'(पर्व ६ वे) उत्साहात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

डोणे मावळ : समस्त डोणे युवक आयोजित 'डोणे प्रीमियर लीग २०२५' (पर्व ६ वे) या स्पर्धेत राजगड वॅरिअर्स Vs रायगड रॉयल्स मध्ये अंतिम फेरी पार पडली. यावेळी रायगड रॉयल्स संघ 9 विकेटनी विजयी ठरला . एकूण 5 संघांनी सहभाग नोंदविला त्यापैकी अंतिम सामना रंगलेल्या संघांमध्ये अत्यंत चुरशीचा झाला.एकंदरीत सर्व सामने खूप रंगतदार झाले आणि समस्त डोणेकर यांनी खेळाचा



उत्तम आस्वाद घेतला.कार्यक्रमाचा बक्षीस वितरणसोहळ्या दरम्यान सर्व संघमालक व ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचा सन्मान करण्यात आला.मालिकावीर.सन्मान युवा फलंदाज पै अर्जुन खिलारी यांनी पटकवाला,सामनावीरचा 'किताब रायगड संघाचा कर्णधार स्वप्नील घारे याला प्रधान करण्यात आला, पूर्ण मालिकेत बेस्ट बोलर हर्षल देशपांडे, तर बेस्ट बॅट्समनं बहुमान संदेश चांदेकर याला देण्यात आला यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.बक्षीस वितरण कार्यक्रमत सूत्रसंचालन एकता प्रतिष्ठाणचे खजिनदार विश्वास चांदेकर व अध्यक्ष योगेश कारके यांनी केले. तसेच सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन तालुका राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष संजय कारके व एकता प्रतिष्ठाणचे संस्थापक श्री बाळासाहेब घारेपाटील यांनी केले.सर्व खेळाडूंचे व सर्व संघमालकांचे आभार राजगड संघाचा अष्टपैलू खेळाडू रणजित खिलारी व तिकोना संघाचा उपकर्णधार अक्षय खराडे यांनी मानले. त्यासमयी राष्ट्रवादी काँग्रेस डोणेचे अध्यक्ष राहुल घारेपाटील, राजगडचे संघमालक गणेश घारेपाटील, तानाजी कारके, शालेय शिक्षणसमिती अध्यक्ष शेखर काळभोर, संदीप घारे. रविंद्र घारे,बाळू सुतार,डोणे प्रीमिअर आयोजन समिती व सर्व खेळाडू उपस्थित होते

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 28/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भैरवनाथ संघाला विजेतेपद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




चिखली (प्रतिनिधी ) चिखली येथील ओम साई कबड्डी संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन अंतर्गत पिं चिं. विभाग वरिष्ठ गट निवड चाचणी स्पर्धेत भोसरीच्या भैरवनाथ क्रिडा संस्थेच्या अ गटाने विजेतेपद पटकावले. यावेळी बक्षीस वितरण महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळीअजित गव्हाणे, अतिरिक्त अधीक्षक ट्रिपल महा. केसरी विजय चौधरी,पुणे जिल्हा दुध संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नेवाळे, माजी नगरसेवक पंकज भालेकर, राहुल भोसले, संजय नेवाळे, शिक्षण मंडळाचे माजी उप सभापती विष्णू नेवाळे, गीताराम मोरे,साधना मळेकर, संगीता ताम्हाणे, कबड्डी असोशिएशचे सरकार्यवाह दत्ता झिंजुर्डे, कार्यवाह दत्ता कळमकर, चिखलीचे माजी सरपंच काळुराम यादव,गणपत आहेर, सदाशिव नेवाळे, पोलीस पाटील विष्णू मोरे, विकास साने,अमृत सोनवणे, नवनाथ मोरे,अविनाश मोरे, मुख्य आयोजक राष्ट्रीय कबड्डीपट्टू तथा ओम सई कबड्डी संघाचे अध्यक्ष प्रवीण नेवाळे, उपाध्यक्ष संदीप नेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.अंतिम सामान्यात भैरवनाथ संस्थेच्याच अ गट आणि ब गट यांच्यात चूरशीची लढत झाली.या दोन्ही सामान्यात आष्टापैलू खेळाडू आदित्य चौगुले याने निर्णायक अशी कामगिरी करत विजय खेचून आणला.उपांत्य फेरीत भैरवनाथ क्रीडा संस्था अ गट आणि राकेशभाऊ घुले कबड्डी संघ बोपखेल यांच्यात लढत झाली. भैरवनाथचा ब गट आणि अतुलदादा बेनके स्पोर्ट्स क्लब जुन्नर यांच्यात जोरदार सामना झाला. यावेळी भैरवनाथ संस्थेचे विशाल धावडे आणि कृष्णा शिंदे यांनी चमकदार कामगिरी केली. अंतिम सामन्यात सुनील सिद्धगवळी, निखिल धावडे,संचित पाटील विराज लांडगे यांची उत्तम पकड तर चढाई मध्ये संकेत लांडगे, कृष्णा लांडगे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सामान्यात रंगत आणली.कार्यक्रमाचे सूत्र संचालन दत्तात्रय तरटे यांनी तर आभार प्रवीण नेवाळे यांनी मानले.

# विश्वरत्न इंग्लिश मिडीयम शाळेत बक्षीस वितरण



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चिखली (प्रतिनिधी) मोरे वस्ती येथील विश्वरत्न इंग्लिश मिडीयम शाळेत प्रजासत्ताक दिन मोठा उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सहायक पो निरीक्षक नवनाथ मोटे, पत्रकार शिवाजी घोडे, विठ्ठल पेडणेकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव वाघमोडे, सचिव रमाकांत वाघमोडे, उपाध्यक्ष मोहन देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. पत्रकार शिवाजी घोडे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना आव्हाड, भगवती गडदे यांनी तर आभार प्रतिभा डोके यांनी मानले.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलाकृतीला रसिकांनी टाळ्यांची दाद दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती कांबळे, सोनली तापोळे,कावेरी दिवेकर,सई पांचाळ, माधवी हासूरकर यांच्या सह सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# ५८ व्या निरंकारी संत समागमाची यशस्वीरित्या सांगता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे 27 जानेवारी, 2025: "जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगतीमध्ये नसून आत्मिक उन्नतीमध्ये निहित आहे."असे उद्गार निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या ५८ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समापन दिवशी लाखोंच्या संख्येने उपस्थित मानव परिवाराला संबोधित करताना व्यक्त केले.




या तीन दिवसीय संत समागमाची रविवारी रात्री विधिवतपणे यशस्वीरित्या सांगता झाली. सतगुरु माताजी पुढे म्हणाल्या, मानवी जीवन एवढ्याचसाठी श्रेष्ठ मानले गेले आहे, की या जीवनात आत्मज्ञान प्राप्त करण्याची क्षमता आहे. परमात्मा निराकार असून या परमसत्याला जाणणे हेच मनुष्य जन्माचे परम लक्ष्य होय.

शेवटी, सतगुरु माताजींनी सांगितले, की जीवन एक वरदान असून ते परमात्याशी क्षणोक्षणी संलग्न राहून जगायला हवे. क्षणोक्षणी जीवन योग्य दिशेने व्यतीत केल्याने आपल्याला आत्मिक शांती मिळू शकते आणि आम्ही अनंताच्या दिशेने अग्रेसर होऊ शकतो.तत्पूर्वी समागमाच्या दुसऱ्या दिवशी सतगुरु माताजींनी आपल्या प्रवचनामध्ये सांगितले, की जीवनामध्ये ज्ञान आणि कर्म या दोहोंचा संगम गरजेचा आहे ज्यायोगे जीवन सुखमय बनू शकेल. जसे पक्ष्याला आकाशात झेप घेण्यासाठी दोन्ही पंखांची गरज असते तसेच जीवनात उंच भरारी घेण्यासाठी ज्ञान प्राप्त करुन त्यानुसार कर्म करण्याची गरज असते.

ब्रह्मज्ञानी भक्त जीवनात परमात्म्याशी नाते जोडून प्रत्येक कार्य त्याच्या अनुसंधानामध्ये राहून करत असतो. खरं तर हेच भक्तीचे वास्तविक स्वरूप होय. समागमात आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांनी आपल्या विचारांमध्ये सांगितले, की भक्ती करण्याचा हेतु हा परमात्म्याशी प्रेम जोडण्याचा असावा.

या संदर्भात संतांचे जीवन आम्हाला प्रेरणादायी ठरते.

कारण संत आपल्या आत्म्याचे मूळ स्वरूप जाणून जीवनाला योग्य दिशेला घेऊन जाण्याची शिकवण देतात. आपण आपली आस्था आणि श्रद्धेला सत्याकडे वळविले पाहिजे तेव्हाच परमात्म्याच्या प्रति प्रेम उत्पन्न होईल आणि खऱ्या अर्थाने भक्तीचा विस्तार सार्थक ठरेल.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 28/01/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महानगरपालिकेची नोटीस ; लघुउद्योजक हवालदिल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र प्रादेशिक नगरचना अधिनियम १९६६ कलम ५३ अन्वये चिखली, कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकांना नोटिसा पाठवून या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकाना १५ दिवसात आपली बांधकामे काढून घेण्याविषयी कळविण्यात आले. या नोटिसा पाठविलेल्यामुळे लघुउद्योजकामध्ये घबराट निर्माण झाली असून या औद्योगिक परिसरातील सर्व लघुउद्योजकांनी एकत्र येऊन पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेशी संपर्क साधून संघटनेच्या पदाधिकाऱ्यासह पवारवस्ती ,चिखली येथे बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला पिंपरी चिंवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष- संदीप बेलसरे, सचिव- जयंत कड, उपाध्यक्ष- संजय जगताप, माजी अध्यक्ष- सुरेशतात्या म्हेत्रे, संचालक- नवनाथ वायाळ, संजय सातव, सल्लागार दिनकर साळुंखे तसेच सामाजिक कार्यकर्ते दिनेश यादव, नीलेश नेवाळे, उत्तम बालघरे, मेहर इंडस्ट्रीजचे त्रिभुवन तिवारी, दीपक तिवारी, भालचंद्र गुंठे, निखिल कालकूटटे व अनेक लघुउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते, या बैठकीला संघटनेच्या पदाधिकाऱ्यानी मार्गदर्शन केले.

REGISTRATION NO.: F-1597 Dt. 21-8-1980

Pimpri Chinchwad Small Industries Association

पिंपरी - चिंचवड लघुउद्योग संघटना

या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजक वेळेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा मालमत्ता कर, पाणी बिल भरणा करत असून या औद्योगिक परिसरात लघुउद्योजकानी कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे आपल्या समस्येवर उपाय काढणेकरीता पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटने मार्फत भोसरीचे आमदार मा. श्री. महेशदादा लांडगे यांचेसह पिंपरी चिंचवड महानगर पालिकेकडे या समस्येविषयी उपाय योजना काढण्याकरिता येत्या एक दोन दिवसात पुढील दिशा सर्वानुमते ठरविण्यात येईल.

सदर औद्योगिक परिसरात साधारणपणे दिड ते दोन हजार लघुउद्योजक आहेत. या लघुउद्योजकांकडे १५ ते २० हजार कामगार काम करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. या लघुउद्योगांवर अजून काही छोटे मोठे उद्योग व व्यापारी अवलंबून आहेत. म्हणजेच या लघुउद्योगांवर साधारणपणे एक ते दिड लाख लोकांचा उदरनिर्वाह चालू आहे.

सदर औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकांचे उद्योग हे गेल्या २० ते २५ वर्षांपासून सुरू आहेत. या परिसरातील लघुउद्योजकांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे हे लघुउद्योजक midc परिसरात भूखंड उपलब्ध नसल्या कारणाने या लघुउद्योजकानी चिखली औद्योगिक परिसरात १,२,५, ते १० गुंठे असे भूखंड विकत घेऊन उद्योग चालू केलेले आहेत.

या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकांपासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला मालमत्ता कर व इतर स्वरूपाचा महसूल मिळत आहे. तसेच महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांना वेगवेगळ्या स्वरूपाचा महसूल मिळत आहे. तसेच महावितरणला देखील मोठ्या प्रमाणात महसूल मिळत आहे.

या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजक हे बजाज, फोर्स मोटर्स, टाटा मोटर्स, महिंद्रा, थरमेक्स , अल्फा लावल्ह या मोठ्या कंपन्याना लागणाऱ्या पार्टसचे उत्पादन करतात. या परिसरातील लघउद्योग बंद केल्यास वरील कंपन्याच्या उत्पादनावर फार मोठा परिणाम होऊ शकतो. कामगार बेरोजगार होऊ शकतात. लघुउद्योजकानी बँकेकडून घेतलेली कर्जे तो फेडू शकणार नाही, यांचा परिणाम बँकेवर देखील होऊ शकतो. घेतलेले कर्ज उद्योजक परत फेड करू न शकल्यास उद्योजकाला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. असे झाल्यास समाजमाध्यमात पालिकेविषयी व राज्य शासना विषयी वेगळाच संदेश जाईल. व त्याचा औद्योगिक परिसरावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने चिखली औद्योगिक परिसरातील लघुउद्योगावर कारवाई केल्यास पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना व या परिसरातील लघुउद्योजक सभासदाकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल. अशा भावना लघुउद्योजकानी व्यक्त केल्या.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस.बी. पाटील पब्लिक स्कूल येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

उद्योजक शंतनु प्रभुणे, सोनाली प्रभुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. संगीत शिक्षिका सुलोचना पवार यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्या डॉ. बिंदु सैनी, उपमुख्याध्यापिका पद्मा बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांनी स्वागत केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. शिक्षिका भारती कबीर यांनी देशभक्तीपर हिंदी गीत सादर केले. शिक्षिका जीली अँथनी यांनी आभार मानले.





बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968